# Best Practice –I

“KATARIYA PRIZE DISTRIBUTION CEREMONY 2022-23”














# परभणी Live

देशोन्नती
८, दि. २३ सप्टेंबर २०२२ ■ https://www.deshonnati.com

## रेकॉर्ड करण्यापेक्षा प्रत्यक्ष ऱ्हदयात राहणे गरजेचे

### जिल्हाधिकारी आंचल गोयल यांचे प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन....

**मानवत** ■ आत्मविश्वास, आव्हानात्मक परिस्थिती वर मात करण्यासाठी सकारात्मक दृष्टी खूप महत्वाची आहे. परिस्थिती बदलली जाणे आवश्यक आहे असे मानले तर त्यासाठी आपल्या विचार आणि कृती मध्ये लवचिकता असणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी मानवत के. के. एम. महाविद्यालय गुरवार २२ सप्टेंबर रोजी आयोजीत केलेल्या कटारिया व अन्य पारितोषीकांच्या वितरण प्रसंगी बोलताना केले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार कत्रुवार होते तर व्यासपीठावर संस्थेचे सचिव बालकिशन चांडक, डॉ. द्वारकादास लहा, रामचंद्र, उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, तहसीलदार सारंग चव्हाण, सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना जिल्हाधिकारी म्हणाल्या की, बँकेचे व्यवस्थापन तसेच अनेक बाबतीत जागरूकता असणे खूप गरजेचे आहे. खरंतर शिक्षणाला तासात मोजणे अशक्य आहे. महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांपैकी परभणी हा जिल्हा शिक्षणा च्या बाबतीत बत्तीसव्या क्रमांकावर आहे तसेच जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण खूप जास्त आहे. ते कमी करण्याचे प्रशासनाचे उद्दीष्ट आहे. परभणी जिल्ह्यातील सिंचनाचे क्षेत्र वाढून येथील लोकांची आर्थिक स्थिती बदलणे खूपच महत्वाचे आहे. त्या साठी क्राप पॅटर्न बदलण्याचे आवाहन त्यांनी बोलताना केले. जिल्ह्याच्या एकुण क्षमतेचा विचार करता आपण खूप कमी कष्ट करतो परंतु या दृष्टीकोनात बदल करणे आवश्यक आहे. तरच आपल्याला सर्वांगीण विकासाचे उद्दीष्ट गाठता येईल असे सांगितले या प्रसंगी जिल्हाधिकारी यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या राष्ट्रीय शिक्षण धोरण विशेषांकाचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. भास्कर मुंडे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. शारदा राऊत यांनी केले तर आभार प्रा. अनिल कापसे यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

मानवत : **येथील महाविद्यालयात राष्ट्रीय शिक्षण धोरण विशेष अंकाचे विमोचन जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अध्यक्ष विजयकुमार कत्रुवार, सचिव बालकिशन चांडक, डॉ. द्वारकादास लहा, उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, तहसीलदार सारंग चव्हाण व इतर.**

College Library
स्थापना १९३९

...खंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

# पुढारी

www.pudhari.com

नांदेड-परभणी-हिंगोली | शनिवार । दि. २४ सप्टेंबर २०२२ । वर्ष ६, अंक २५७ । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा

## रेकॉर्डपेक्षा प्रत्यक्ष हृदयात राहणे गरजेचे : जिल्हाधिकारी गोयल

मानवत, पुढारी वृत्तसेवा : आत्मविश्वास, आव्हानात्मक परिस्थितीवर मात करण्यासाठी सकारात्मक दृष्टी महत्त्वाची आहे. यासाठी विचार, कृतीत लवचिकता असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी केले.

केकेएम महाविद्यालयात गुरुवारी कट्यारिया व अन्य पारितोषिक वितरण झाले. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष विजयकुमार कत्रुवार होते. यावेळी उपाध्यक्ष डॉ. द्वारकादास लड्डा, सचिव बालकिशन चांडक, कोषाध्यक्ष रामचंद्र कत्रुवार, एसडीएम शैलेश लाहोटी, तहसीलदार आदी हजर होते. जिल्हाधिकारी गोयल म्हणाल्या, वेळ व्यवस्थापनसह जागरूकता गरजेचे आहे. ३५ जिल्ह्यांपैकी परभणी शिक्षणाबाबत ३२ व्या क्रमांकावर आहे. जिल्ह्यात बालविवाह प्रमाण कमी करण्याचे प्रशासनाचे उद्दिष्ट आहे. जिल्ह्यातील सिंचन क्षेत्र वाढून लोकांची आर्थिक स्थिती बदलणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी क्रॉप पॅटर्न बदलण्याचे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी जिल्हाधिकारी गोयल यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या राष्ट्रीय शिक्षण धोरण विशेषांकाचे विमोचन झाले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. भास्कर मुंडे यांनी केले.

# Best Practice –II

“MANVATA 2022-23” COLLEGE ANNUAL MAGAZINE
SPECIAL ISSUE ON HYDERABAD LIBERATION MOVEMENT




